# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

जा.क्र.मप्रनि/आस्था/ब-३४५
कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
सायन माटुंगा स्किम रोड क्र.८,
सायन सर्कल समोर, सायन (पूर्व)
मुंबई: ४०० ०२२.

दिनांक: १९/०३/२०१२

## प रि प त्र क

विषय: रजेचा अर्ज सादर करण्याबाबत

विषयास अनुसरुन सर्व कार्यालय प्रमुख/ विभागप्रमुख तसेच आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले सर्व अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, रजेवर जाण्यापूर्वी रजेचा अर्ज विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत मंजूर करुन, रजा मंजूरीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधीत अधिकाऱ्याने रजा उपभोगावयाची आहे.

जर एखादा अधिकारी दिर्घ कालावधीसाठी रजेवर जात असल्यास त्याचा पदभार कोणत्या ज्येष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्याकडे सुपूर्द करावा, याबाबत योग्य त्या अधिकारी/कर्मचाऱ्याच्या नावानिशी शिफारस करावी. जे अधिकारी वैद्यकीय कारणास्तव रजेवर असतील त्यांच्या विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांनी तसा अहवाल आस्थापनाशाखेस योग्य त्या शिफारशीसह विनाविलंब सादर करावा. जेणेकरुन दैनंदिन कार्यालयीन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी इतर अधिकाऱ्यांची किंवा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे सुलभ होईल.

सदर परिपत्रकानुसार सहकार्य करावे.

( सुजाता शेटये )
लेखा अधिकारी (आस्थापना)

प्रत माहितीसाठी-

१. प्रधान वैज्ञानिक अधिकारी/जल प्रदूषण निवारण अभियंता/हवा प्रदूषण निवारण अभियंता
२. सहायक सचिव (तांत्रिक)मुख्य लेखा अधिकारी, मुंबई/वरिष्ठ विधी अधिकारी, विधी व योजना विभाग-१
३. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी,मध्यवर्ती प्रयोगशाळा,निर्मलभवन,महापे, नवी मुंबई/नागपूर
४. सह-संचालक, पाम्स/कार्यकारी अभियंता
५. प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/प्रकल्प व योजना/मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/नवीमुंबई/पुणे/नशिक/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर
६. उप-प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/मुंबई-४/ठाणे-१/ठाणे-२/तारापूर-१/तारापूर-२/नवी मुंबई-१/नवीमुंबई-२/तळोजा/कल्याण-१/कल्याण-२/कल्याण-३/भिवंडी/रायगड-१/रायगड-२/रायगड /महाड/कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/चिपळूण/पुणे-१/पुणे-२/पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/औरंगाबाद-१/औरंगाबाद-२/औरंगाबाद-३/नांदेड/नाशिक/अहमदनगर/जळगाव-१/जळगाव-२/नागपूर-१/नागपूर-२/नागपूर-३/चंद्रपूर/अमरावती-१/अमरावती-२/अकोला/परभणी/लातूर/भंडारा.
७. वैज्ञानिक अधिकारी,प्रादेशिक प्रयोगशाळा, नागपूर/नाशिक/पुणे/औरंगाबाद/चिपळूण/ठाणे/चंद्रपूर
८. विधी अधिकारी,विधीशाखा/सांख्यिकी अधिकारी/ लेखा अधिकारी,उपकरशाखा/
९. संकेतस्थळ, पर्यावरण माहिती केंद्र, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
१०. परिपत्रक नस्ती- २०१२/मुख्य नस्ती- २०१२

D:\trupti backup 4.02.2012\Documents and Settings\My Documents\trupti2012\circular.doc